# - प्रेस नोट -

दि. १२/०८/२०२६

## शिवाजीनगर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.१०/०८/२०२६ रोजी २३.०० च्या सुमारस फिर्यादी नायब रझा सय्यद , वय-३५ वर्षे, धंदा-रिक्षाचालक, रा.ठी- कमलारामणनगर बिहारी मस्जिद रझा चौक, बैगणवाडी, गोवंडी मुंबई, हे घराचे दारात पाईपलाईनचे काम करित असताना अटक आरोपी क्रमांक ०१ पुरूष, वय १९ वर्षे याने फिर्यादी यांना पाठीमागुन येवुन डोक्यात विनाकारण टपली मारली त्यामुळे फिर्यादी याने अटक आरोपी क्र.०१ यास त्याबाबत जाब विचारला असता अटक आरोपी क्र.०१ हा रागाच्या भरात शिवीगाळ करू लागला ते पाहुन अटक आरोपी क्र. ०२ पुरूष ,वय २१ वर्षे हा देखील त्याठिकाणी आला व फिर्यादी यांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरूवात केली. त्यावेळी फिर्यादी यांचे वडील व वहिनी हे दोघे फिर्यादी यांना सोडवायला आले असता अटक आरोपी क्र.०१ याने फिर्यादी यांच्या वहिनीचे केस पकडुन त्यांना मारहाण केली व अटक आरोपी क्र. ०२ याने फिर्यादी यांच्या वडिलांच्या तोंडावर ठोसा मारला. वहिनी व वडिलांना मारल्याचे पाहुन फिर्यादी यांनी अटक आरोपी क्र.०१ व अटक आरोपी क्र.०२ याला विरोध केला असता त्यापैकी अटक आरोपी क्र.०२ याने फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देऊन पॅन्टच्या खिश्यातुन ब्लेड काढुन फिर्यादी यांच्या पोटावर मारून जखमी केले तसेच फिर्यादी यांना मार लागल्याचे पाहुन आजुबाजुचे लोक वाचवायला आले असता त्यांना देखील धमकी दिल्याने लोक पळुन गेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. ११/०८/२०२६ रोजी गु.र.क्र. ६७७/२६, कलम १०९(१), ३५१(३), ३५२,बीएनएस २०२३, ३७(१)(ए),१३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------